| MHSN05001408-2026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९१/२०२६**<br>**मधील निशाणी क्र.१ वरील आदेश**<br>**गोपाल सोमेसिंग लमाणी विरुध्द महाराष्ट्र सरकार** |
| --- | --- |

अर्जदार गोपाल सोमेसिंग लमाणी यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४९७ व ५०३ प्रमाणे कुरळप पोलीस ठाणे गु.र.नं. ३७/२०२६ कामी जप्त मुद्देमाल गाडी नं. के.ए–२८–एच.डी–३३१४ हे वाहन सदर गुन्ह्यात जप्त असून परत मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, कलम १ मध्ये वर्णन केलेला मुद्देमाल अर्जदार वापरत होते व आहे. सदरचे वाहन हे सदर गुन्ह्याकामी जप्त केले आहे. सदरचे वाहन पोलीस स्टेशनला पडून राहिल्यास खराब होणार आहे. करिता, सदरचे वाहन दैनंदिन वापराकरीता अर्जदार यांना आवश्यक असल्याने परत मिळावे अशी विनंती त्यांनी केली आहे.

३. सदर अर्जावर कुरळप पोलीस ठाणे यांनी नि.५ कडे म्हणणे दाखल केले आहे की, अटी शर्तीवर सदर मुद्देमाल परत देण्यास हरकत नाही.

४. सदर अर्जावर सरकारी वकिलांनी त्यांचे म्हणणे नि.७ खाली म्हणणे दाखल केले आहे की, योग्य तो आदेश पारित करावा.

५. अर्जदार यांनी अर्जाच्या पृष्ठ्यर्थ कुरळप पोलीस ठाणे गु.र.नं. ३७/२०२६ ची एफ.आर.ची ऑनलाईन प्रत, अर्जदार यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, गाडीचे आर.सी. बुक व इन्श्यूरन्स पावती इत्यादी दस्त दाखल केलेले आहेत. सदर गुन्ह्यामध्ये सदरचे वाहन जप्त केलेले आहे. सदर गुन्ह्यातील जप्त वाहन हे पोलीस स्टेशनच्या आवारात राहिल्यास खराब होण्याची व निष्क्रीय

होण्याची शक्यता आहे. त्यामुळे योग्य त्या अटी शर्तीवर वाहन परत करणे न्यायोचित होईल. करिता, उपरोक्त सर्व कारणांमुळे खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

**१**. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२**. अर्जदार गोपाल सोमेसिंग लमाणी, रा. टक्कलाकी, ता. बिजापूर, जि. बिजापूर, कर्नाटक राज्य यांच्या मालकीची मोटार सायकल नं. के.ए–२८–एच.डी–३३१४ या वाहनाचा अंतरिम ताबा रक्कम रुपये ८०,०००/– चे बंधपत्र २००/– च्या बॉन्ड पेपरवर सादर केल्यानंतर खालील अटी–शर्तीवर देण्यात यावा.

**अ.** अर्जदार यांनी जप्त वाहन आहे त्या स्थितीत ठेवावे व त्यात रंग, स्वरुप किंवा कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येवू नये व इतर कोणालाही कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यात येवू नये. तसेच कुरळप पो. ठाणे येथील गु.रं.क्र. ३७/२०२६ चे सुनावणी दरम्यान सदर वाहन निर्देशित केल्याप्रमाणे वेळावेळी हजर करण्यात यावा.

**ब.** अर्जदार यांना सदर वाहनाचा ताबा देण्यापूर्वी संबंधित तपासी अधिकारी यांनी जप्त वाहनाचा साक्षीदारांसमक्ष पंचनामा तयार करुन व छायाचित्रे काढून दोषारोपपत्रासह न्यायालयात दाखल करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित).

MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY

Digitally signed by MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY
Date: 2026.06.30 15:38:16 +0530

इस्लामपूर
दिनांक. ३०.०६.२०२६.

(मृण्मयी मु. चौधरी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.१, इस्लामपूर.

| -:CERTIFICATE:- | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file order is same word as per original order. | | |
| Name of Stenographer | :- | Satish N. Pethkar, |
| Court Name | :- | Mrunmayee M. Choudhary.<br>Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C.,<br>Islampur |
| Date of decision | :- | 30.06.2026. |
| Order signed by P.O. on | :- | 30.06.2026. |
| Order uploaded on | :- | 30.06.2026. |